महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

**अतितात्काळ**
**कालमर्यादा : दिनांक ०५ एप्रिल, २०२२**
**(दुपारी ०३:०० वाजेपर्यंत)**

जा.क्र.तीशीविकापु/विवि-१/वृक्षलागवड /२०२२/ 1623
दिनांक : 04 APR 2022

प्रति,
संचालक / प्राचार्य
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबतच्या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषंगाने गठित करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समितीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत.**

संदर्भ :- १.उप वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र.कक्ष-२/वृक्ष लागवड/०१/२०२२-२३, दि. ०४.०४.२०२२
२. उपजिल्हाधिकारी कार्यालय (रोहयो), पुणे यांचेकडील पत्र क्र.तांत्रिक/ कावि/१३१/२०२२, दि.३१.०३.२०२२.
३.उप आयुक्त (रोहयो),पुणे वनविभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. मग्रारोहयो/वृ.ला./काति-२२/२०२१, दि.३१.३.२०२२.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-४रोहयो/I.AQ/ प्र.क्र.०८/ ३२९/२०२१-२२, दि२९.०३.२०२२. व

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ ते ३ च्या छायांकित प्रती आपल्या माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी या पत्रासोबत जोडल्या आहेत. पत्रात नमूद केलेले प्रपत्र – १ मध्ये रोपे लागवडी व खरेदीबाबतची माहिती गुगल फॉर्ममध्ये **(Google Form)** मध्ये सोबत दिलेल्या लिंकवर भरावयाची आहे तरी आज दिनांक ०५.०४.२०२२ रोजी, दुपारी ०३:०० वाजेपर्यंत या विभागीय कार्यालयास सदरची माहिती **तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९** च्या अनुषंगाने शासनास सादर करावयाची असल्याने, **आपल्या संस्थेची अचूक माहिती भरण्याबाबत दक्षता घेण्यात यावी,** अन्यथा चुकीची माहिती सादर केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखाची राहील याची नोंद घ्यावी.

सोबत : संदर्भिय पत्रांच्या छायांकित प्रती.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन

उप वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे

सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४

दूरध्वनी- ०२० २५६६ ०५९३ ई-मेल-dycfpune@gmail.com

जा.क्र.कक्ष-२/वृक्ष लागवड/०१/२०२२-२३ पुणे ४११००४ दि. ०४ /०४/२०२२

**अति तात्काळ/महत्त्वाचे**

प्रति,

सर्व यंत्रणा प्रमुख

विषय - राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबतच्या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समितीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत

संदर्भ - १. उपजिल्हाधिकारी कार्यालय, (रोहयो), पुणे यांचेकडील पत्र क्र. तांत्रिक/कावि/१३१/२०२२/ दि. ३१/०३/२०२२

२. उप आयुक्त (रोहयो), पुणे वनविभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. मग्रारोहयो/वृ.ला./कावि-२२/२०२१ दि. ३१/०३/२०२२

३.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-४/रोहयो/LAQ/प्र.क्र.०८/३२९/२०२१-२२ दि. २९/०३/२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ ते ३ च्या छायांकित प्रती आपले माहिती तथा आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी या पत्रासोबत जोडल्या आहेत. पत्रात नमूद केलेले प्रपत्र - १ मध्ये रोपे लागवडी व खरेदीबाबतची माहिती भरुन Hard copy व Soft copy आजच या कार्यालयास सादर करावी.

तसेच विषयांकित प्रकरणाच्या अनुषंगाने विधान मंडळाच्या तदर्थ समितीस सदर माहिती उपलब्ध करणेकामी दि. १२/०४/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे. तदअनुषंगाने आपलेकडील माहिती आजच www. Mahaforest.gov.in या वेबसाईटवर अदययावत करण्यात यावी. यांस प्रथम प्राधान्य दयावे. माहिती अदययावत करणेकरिता युझर आय डी व पासवर्ड पुढीलप्रमाणे -

User Id - Pune

Password - Pune#१२३

(राहुल पाटील)भा. व. से.

उप वनसंरक्षक, पुणे तथा

सदस्य सचिव, पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती पुणे

प्रतिलिपी - विभागीय आयुक्त कार्यालय, (रोहयो), विधान भवन, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी - मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रतिलिपी - उपजिल्हाधिकारी, (रोहयो), पुणे यांना माहितीसाठी रवाना

प्रतिलिपी - सहाय्यक वनसंरक्षक, (ववसं), पुणे यांना माहिती तथा आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना

जिल्हाधिकारी कार्यालय (रोजगारहमी योजना शाखा)
बी विंग, तळमजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, पुणे.
ईमेल- dcegspune1@gmail.com
दुरध्वनी क्रमांक-020 2611106

जा.क्र./तांत्रिक /कावि/939/२०२२
पुणे दि. 31/०३/२०२२

तात्काळ/अति महत्त्वाचे

प्रति,

मा. उपवनसंरक्षक
पुणे वनविभाग, पुणे तथा सदस्य सचिव,
(पुणे जिल्हा वृक्ष लागवड समिती पुणे)
उपवनविभाग पुणे

विषय :राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबतच्या विषयावरील तारांकीत प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषुगाने गठीत करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समिहतीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत.

संदर्भ: २)मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयीन पत्र क्र.कक्ष-४/रोहयो/LAQ/प्र.क्र.०८/३२९/२०२१-२२नागपूर दिनांक २९/०३/१२.
३)मा. उपायुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय यांचेकडील पत्र क्र. मग्रारोहयो /वृ.ला. /कावि-२२/२०२१ दिनांक ३१/०३/२०२२.

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, सन -२०१७ ते २०१९ या ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला असून या कार्यक्रमासाठी सर्व जिल्हयांस विभागनिहाय/यंत्रणानिहाय उद्दिष्ट देण्यात आले होते. उपरोक्त विषयी पुणे विभागाचे १०१% इतके उद्दिष्ट साध्य झालेले आहे.

तथापि मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडील संदर्भिय पत्रान्वये वृक्षलागवडी संदर्भात १) एकूण रोपे लागवड २) रोपे उपलब्ध कोठून करण्यात आली ३)रोपे खरेदीच्या रक्कमा ४)जिवंत रोपांची टक्केवारी इ. बाबतची माहिती विहीत विवरणपत्रामध्ये दिनांक ०४/०४/२०२२ पर्यंत Hard Copy व Soft Copy सह तातडीने email व स्पिड पोस्टद्वारे सादर करणेबाबत [illegible]त केले आहे. वृक्ष लागवडसंदर्भातील तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समितीस सदर माहिती उपलब्ध करुन दयावयाची असून समितीची बैठक दिनांक १२/०४/२०२२ रोजी प्रस्तावित करण्यात आली आहे. तरी विषयांकित प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन प्रथम प्राधान्याने सदरची माहिती संदर्भिय पत्रासोबत देण्यात आलेल्या प्रपत्र क्र. १ मध्ये स्वाक्षरीसह या कार्यालयास Hard Copy व Soft Copy सह दिनांक ०१/०४/२०२२ पूर्वी पाठविण्यात यावी, ही विनंती.

तसेच संदर्भिय पत्रात सूचित केलेनुसार सदर प्रकरणी वेळीच माहिती सादर होण्याच्या दृष्टीने जिल्हानिहाय केंद्रस्थ अधिकारी यांची कृपया नेमणूक करुन त्यांचे नाव, पद,पत्ता, दुरध्वनी क्रमांक इ. माहिती मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयास कळविण्यात यावी व त्याबाबत या कार्यालयासही अवगत करण्यात यावे, ही विनंती.

सोबत: संदर्भिय पत्र व विवरणपत्र

(डॉ.वनश्री लाभशेटवार)
उपजिल्हाधिकारी, (रोहयो) पुणे

प्रति: १)कृषि विकास अधिकारी , जिल्हा परिषद पुणे, सोबत दिलेल्या प्रपत्र -१ ची माहीती त्वरीत सादर करावी.

विभागीय आयुक्त कार्यालय
(रोहयो शाखा) विधान भवन,पुणे
दूरध्वनी क्रमांक- ०२०/२६३६१०५९
ई-मेल -- egs.divcompune@gmail.com

दिनांक :- ३१/०३/२०२२.

क्र.मग्रारोहयो/वृ.ला./कावि- २१/२०२१

**समयमर्यादा/तातडीचे**

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर

विषय :- राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमे बाबतच्या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समितीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत . . . . .

संदर्भ:- मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक- अर्थसंकल्प, नियोजन व विकास, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-४/रोहयो/LAQ/३२९/२०२१-२२ दि.२९/०३/२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सन २०१७ ते २०१९ या ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला असून या कार्यक्रमासाठी सर्व जिल्हयांस विभागनिहाय/यंत्रणानिहाय उदिदष्ट देण्यात आले होते. उपरोक्त विषयी पुणे विभागाचे १०१% इतके उदिदष्ट साध्य झालेले आहे.

तथापि मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांचेकडील संदर्भिय पत्रान्वये वृक्षलागवडी संदर्भात १) एकूण रोपे लागवड २) रोपे उपलब्ध कोठून करण्यात आली ३) रोपे खरेदीच्या रक्कमा ४) जिवंत रोपांची टक्केवारी इ. बाबतची माहिती विहीत विवरणपत्रामध्ये दिनांक ०४/०४/२०२२ पर्यंत Hard copy व Soft copy सह तातडीने email व स्पिड पोस्टद्वारे सादर करणेबाबत सूचित केले आहे. वृक्ष लागवडीसंदर्भातील तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समितीस सदर माहिती उपलब्ध करुन दयावयाची असून समितीची बैठक दिनांक १२/०४/२०२२ रोजी प्रस्तावित करण्यात आली आहे. तरी विषयांकित प्रकरणाचे गांभिर्य लक्षात घेऊन प्रथम प्राधान्याने सदरची माहिती संदर्भिय पत्रासोबत देण्यात आलेल्या प्रपत्र क्र.१ मध्ये स्वाक्षरीसह या कार्यालयास Hard copy व Soft copy सह दिनांक ०१/०४/२०२२ पूर्वी पाठविण्यात यावी, ही विनंती.

तसेच संदर्भिय पत्रात सूचित केलेनुसार सदर प्रकरणी वेळीच माहिती सादर होण्याच्या दृष्टीने जिल्हानिहाय केंद्रस्थ अधिकारी यांची कृपया नेमणूक करुन त्यांचे नाव, पद, पत्ता, दुरध्वनी क्रमांक इ.माहिती मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयास कळविण्यात यावी व त्याबाबत या कार्यालयासही अवगत करण्यात यावे, ही विनंती.

सोबत संदर्भिय पत्र व विवरणपत्र

( नयना बोंदार्डे )
उपआयुक्त (रोहयो)
पुणे विभाग, पुणे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय
(प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर)
"वनभवन", रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१
दुसरा माळा, डी विंग, दूरध्वनी क्रमांक-०७१२-२५५६७८५.
Phone No : ०७१२-२५५६७८५
E-mail ID pccfbpd@mahaforest.gov.in
ISO 9001: 2015

तातडीचे/ विधानमंडळ कामकाज
स्पिडपोस्ट/ईमेलव्दारे

क्र.कक्ष-४/रोहयो/LAQ/प्र.क्र.०८/२२९/२०२१-२२
नागपूर ४४० ००१, दिनांक २१/०३/२०२२

प्रति,

१) विभागीय आयुक्त,
नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/कोकण/पुणे
२) जिल्हाधिकारी (सर्व)

विषय:- राज्यात ३३ कोटी वृक्षलागवडींसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबतच्या विषयावरील तारांकीत प्रश्न क्रमांक २१८०९ च्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या विधान मंडळाच्या तदर्थ समितीस माहिती उपलब्ध करून देण्याबाबत

संदर्भ:- १) शासन निर्णय महसूल व वनविभाग, क्र.सावबि-२०१६/प्र.क्र.८०/फ-११, दि.१० ऑक्टोबर, २०१६
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक(माहिती तंत्रज्ञान व धोरण) यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१५/आयसीटी/प्र.क्र.१०९/ ८९७/२०१७-१८, दि.१९/१२/२०१७,
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक(माहिती तंत्रज्ञान व धोरण) यांचेकडील पत्र क्र.Desk-15/ICT/F.No.59 VI/693, dt.02/.11.2018 व समक्रमांक पत्र क्र.810, dt.05.12.2018
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक(माहिती तंत्रज्ञान व धोरण) यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१५/आयसीटी/जिरोट/ १३२/२०२१-२२, दि.१३/०७/२०२१
५) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष -४/रोहयो/प्र.क्र.८/२०२१-२२/२४१, दि.१५/१२/२०२१
६) कक्ष अधिकारी, फ-११, महसूल व वनविभाग शासन पत्र क्र.विसप्र-२१/प्र.क्र.९/फ-११, दि.२१/०३/२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र.१ चे शासन निर्णयान्वये सन २०१७ ते २०१९ या ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला होता. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी वनविभाग, इतर शासकीय विभाग व ग्रामपंचायतीकरीता खालीलप्रमाणे रोपे लागवडीचे उदिष्ट वाटप करण्यात आले होते.

| अ.क्र. | वर्ष | प्रस्तावित कालावधी | वन विभाग | इतर विभाग | ग्रामपंचायत | एकूण उदिष्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७ पावसाळा | ०१ जुलै ते ०७ जुलै२०१७ | २.२५ कोटी | ७५ लक्ष | १ कोटी | ४ कोटी |
| २ | सन २०१८ | १५ जून ते १ जुलै २०१८ | ७.५० कोटी | २.५० कोटी | ३ कोटी | १३ कोटी |
| ३ | सन २०१९ | १५ जून ते ७ जुलै २०१९ | १८.७५ कोटी | ६.२५ कोटी | ८ कोटी | ३३ कोटी |
| | एकूण | | २८.५० कोटी | ९.५० कोटी | १२ कोटी | ५० कोटी |
| | | | एकूण ३८ कोटी | | १२ कोटी | ५० कोटी |

२. घरील उद्दीष्टानुसार संपूर्ण राज्यात अतिशय काटेकोर नियोजन करुन शिस्तबद्ध पध्दतीने वृक्ष लागवड
करण्यात आली. या संपूर्ण कार्यक्रमा दरम्यान वनविभाग वगळता इतर शासकीय विभाग व ग्रामपंचायतीव्दारे
करावयाच्या लागवडीचे सनियंत्रण जिल्हाधिकारी यांचे मार्फत करण्याचे निर्देश देण्यात आले होते. या संदर्भात
उपरोक्त संदर्भित दि.१०/१०/२०१६ रोजीच्या शासन निर्णयात परिच्छेद क्र.१० मध्ये खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या
आहेत.

" वर नमुद केल्याप्रमाणे जिल्हाधिका-यांनी जागा उपलब्धतेबाबत डेटा बेस तयार झाल्यावर वृक्ष
लागवडी अंतर्गत प्रत्येक विभागाने जिल्हा , तालुका आणि ग्रामस्तरावरील समित्यांमार्फत दि. ३१
डिसेंबर पर्यंत कार्यक्रमाचा सुक्ष्म आराखडा (Micro Pan) तयार करावा. संपूर्ण कार्यक्रमाचे पर्यवेक्षण व
संनियंत्रण जिल्हाधिकारी यांनी करावे. असा सूक्ष्म आराखडा तयार करतांना , वन विभागाने विकसित
केलेल्या जिओ टॅगिंग (Geo-Taging) या संगणकीय प्रणालीव्दारे अक्षांश व रेखांश यासह स्थळ
निश्चिती, योग्य रोपांची उपलब्धता, मनुष्यबळाची निश्चिती ,शासकीय व निम शासकीय यंत्रणा/
खाजगी व्यक्ती व संस्था/ विद्यार्थी व स्वयंसेवक इत्यादींशी संपर्क साधून त्यांना सक्रीय करणे ,
वृक्षलागवडीच्या कालावधीमध्ये प्रत्येक दिवशी किती वृक्षारोपण होणार याचा आराखडा आणि या
संदर्भातील प्रत्यक्षदर्शी अहवाल (Real Time Reporting) व अतिमत: संगोपनाचा अहवाल विहित
संगणकीय प्रणालीमध्ये भरणे इत्यादी व अनुषंगिक विषयांचा समावेश असेल"

३. तदनुसार सर्व शासकीय विभाग व ग्रामपंचायती यांचेमार्फत करण्यात आलेल्या वृक्ष लागवडीतील जिवंत
रोपांची टक्केवारी नियमितपणे वनविभागाला कळविणे अपेक्षित होते व याबाबत आपणास प्रधान मुख्य
वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण) नागपूर यांचेमार्फत संदर्भिय पत्र क्र.२ ते ४ अन्वये वेळोवेळी
कळविण्यात आले आहे. तसेच या विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाकडीलसंदर्भिय क्र. ५ अन्वये यापूर्वीच
विहीत प्रपत्रात माहिती मागविण्यात आली आहे. **परंतु अदयापही सदर माहिती अप्राप्त आहे.**

४. विषयांकीत प्रकरणीच्या अनुषंगाने स्थापित विधानमंडळाच्या तदर्थ समितीची बैठक दिनांक
०८/१२/२०२१ रोजी आयोजीत करण्यात आलेली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या
कार्यवृत्तांतानुसार विधान मंडळ सचिवालयाची प्रश्नावली संदर्भिय पत्र क्र. ६ अन्वये प्राप्त झालेली आहे
(प्रत सोबत). सदर पत्रातील प्रश्न क्र.४ व ६ च्या अनुषंगाने रोपे लागवडीच्या मोहिमेत सहभागी झालेल्या वन
विभाग वगळता इतर सर्व शासकीय विभागांमार्फत व ग्रामपंचायती मार्फत करण्यात आलेल्या रोपे लागवडी
संदर्भात रोपे उपलब्धताबाबत व रोपे खरेदीबाबत अदयावत माहिती सोबतचे विहीत प्रपत्रात Excel Sheet मध्ये
तयार करुन घेऊन Soft Copy सह तातडीने या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यास विनंती करण्यात येत
आहे.

५. दिनांक ०८/१२/२०२१ व त्यानंतर दिनांक २१/०३/२०२२ रोजी झालेल्या विधानमंडळाच्या तदर्थ
समितीच्या सभेमध्ये प्राप्त सूचनेनुसार या कार्यालयाचे यापूर्वीचे संदर्भ क्र.५ सोबतच्या प्रपत्रात अंशत: सुधारणा

करुन सुधारीत प्रपत्र यासोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. करीता ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत आपल्या अधिनस्त सर्व विभागांनी केलेल्या वृक्षलागवडी संदर्भात १) एकुण रोप लागवड २) रोपे उपलब्ध करुन करण्यात आली ३) रोप खरेदीच्या रकमेबाबत आणि ४) जिवंत रोपांच्या टक्केवारी बद्दलची माहिती विभाग निहाय सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात या कार्यालयास सादर करावी.

६. प्रपत्र -१ अन्वये तयार करण्यात आलेली इतर शासकीय विभागांची माहिती त्या त्या विभागाच्या जिल्हास्तरीय प्रमुखांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावी व जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्यांच्या स्वाक्षरीसह विभागीय आयुक्त यांना पाठवावी. विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर सर्व माहिती संकलित करुन **Hard copy** व **Soft Copy** सह **(Excel Sheet** मध्ये) या कार्यालयास पाठवावी.

७. या विषयासंबंधी स्थापित तदर्थ समितीची पुढील बैठक दिनांक १२/०४/२०२२ रोजी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर माहिती **दिनांक ०४/०४/२०२२ पर्यंत न चुकता** **Hard copy** व **Soft Copy** सह **(Excel Sheet** मध्ये) या कार्यालयास सादर करावी व त्याची प्रत शासनास सादर करण्यात यावी. यास प्रथम प्राधान्य देण्यात यावे. सदर प्रकरणी वेळीच माहिती सादर होण्याच्या दृष्टिने जिल्हानिहाय केंद्रस्थ अधिकारी यांची कृपया नेमणूक व्हावी व त्यांचे नाव, पद, पत्ता ,दुरध्वनी क्रमांक या कार्यालयास कृपया कळविण्यात यावे.

सहपत्रः- वरीलप्रमाणे

(स्वाक्षरी) २८.०३.२०२२.
(प्रदीप कुमार)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प नियोजन व विकास)
नागपूर

प्रतिलिपीः- प्रधान सचिव (वने) . महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई -32 यांना माहितीकरीता.
प्रतिलिपीः- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) म.रा. नागपूर यांना माहितीकरीता.
प्रतिलिपीः- प्रधान मुख्य वनसंरक्षक(माहिती तंत्रज्ञान व धोरण) यांना माहितीकरीता .

## प्रपत्र- १

## ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमा अंतर्गत इतर शासकीय विभागांनी केलेल्या रोपे लागवडी व खरेदीबाबत माहिती

जिल्हा:-

| अ.क्र. | विभागाचे नाव | वर्ष | स्थळांची संख्या | एकुण लागवड केलेल्या रोपांची संख्या | रोपे कोठून घेतली | | | | | | | | एकुण रोपे खरेदीची किंमत (९+१३) | जिवंत रोपांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शासकीय रोपवाटीका | | | | खाजगी रोपवाटीका | | | | | |
| | | | | | शासकीय रोपवाटीकेचे नाव व स्थळ | रोपांची संख्या | प्रति रोप दर | रोपे खरेदीची किंमत | खाजगी रोपवाटीकेचे नाव व स्थळ | रोपांची संख्या | प्रति रोप दर | रोपे खरेदीची किंमत | | |
| | | | | | | | | | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

टिप:- प्रपत्र -१ अन्वये तयार करण्यात आलेली इतर शासकीय विभागांची माहिती त्या त्या विभागाच्या जिल्हास्तरीय प्रमुखांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावी व जिल्हाधिकारी यांनी संकलित करुन त्यांच्या स्वाक्षरीसह विभागीय आयुक्त यांना पाठवावी. विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या स्तरावर सर्व माहिती संकलित करुन Hard copy व Soft Copy सह (Excel Sheet मध्ये) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) म.रा. नागपूर यांना पाठवावी.

उदाहरणार्थ नमुना

जिल्हा:- अहमदनगर

| अ.क्र. | विभागाचे नाव | वर्ष | स्थळांची संख्या | एकुण लागवड केलेल्या रोपांची संख्या | रोपे कोठून घेतली | | | | | | | | एकुण रोपे खरेदीची किंमत (९+१३) | जिवंत रोपांची टक्केवारी (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | शासकीय रोपवाटीका | | | | खाजगी रोपवाटीका | | | | | |
| | | | | | शासकीय रोपवाटीकेचे नाव व स्थळ | रोपांची संख्या | प्रति रोप दर | रोपे खरेदीची किंमत | खाजगी रोपवाटीकेचे नाव व स्थळ | रोपांची संख्या | प्रति रोप दर | रोपे खरेदीची किंमत | | |
| | | | | | | | | | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | संतोष नर्सरी | १००० | ४० | ४०००० | ६४००० | ७० |
| १ | कृषि विभाग | २०१७ | ५० | ५००० | मध्यवर्ती रोपवाटीका | ४००० | ६ | २४००० | | | | | | |